साप्ताहिक कोकण दिनांक

# लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात जिल्हा स्तरीय युवा महोत्सव कार्यशाळा संपन्न



दोडामार्ग येथील - लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे घेण्यात येणारी जिल्हास्तरीय कार्यशाळा महाविद्यालयात पार पडली ५१ व्या युवामहोत्सवात घेण्यात येणाऱ्या विविध कलाप्रकाराची विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना माहिती व्हावी नियम माहित व्हावेत व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सहभागी होउन आपले कलागुण विकसित करावे यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ. निलेश सावे, जिल्हा समन्वयक डॉ. आशिष नाईक, विजय जाधव, अमोल बावकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन दोडामार्ग नगर पंचायतच्या नगराध्यक्ष सौ. लिना कुबल यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वि. अ.पाटील यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून एकूण सत्तर जणांनी सहभाग नोंदविला. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रशांत ढेपे यांनी तर आभार प्रा. श्रीपाद पाडगांवकर यांनी मानले.